दै. सकाळ दि. 03.01.2020

सकाळ दि. 03.01.2020

# घरफोडी करणाऱ्या टोळीला अटक

## पाच दुचाकींसह पंधरा लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड, ता. २ (बातमीदार) : शहर व जिल्ह्यात घरफोडी व लूटमार करणाऱ्या दोन टोळ्यांना अटक करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. अटक केलेल्या चार चोरट्यांकडून पाच दुचाकींसह १५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याची माहिती पोलिस अधीक्षक विजयकुमार मगर यांनी गुरुवारी (ता. दोन) दुपारी पत्रकार परिषदेत दिली.

शहर व जिल्ह्यात लूटमार करणाऱ्या टोळ्यांचा शोध घेण्याचे आदेश दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी टोळीचा पर्दाफाश करण्यासाठी पथकाची स्थापना केली. या पथकांनी शहरात गस्त घालत बुधवारी (ता. एक) मिळालेल्या गुप्त माहितीवरून आकाश बंडू गुंजावळे (वय २१, रा. गोपाळनगर, बायपास रोड, नांदेड) व उत्सव महादू बलाड (वय १९, रा. मालटेकडी) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता त्यांनी मागील सहा महिन्यांत नांदेड शहर, परिसरात आसना पूल बायपास मार्ग, मालटेकडी पुलाखाली, डी मार्ट मार्ग, सोनखेड मार्ग, सिडको आदी मार्गांवर आठ जणांना अडवून रॉडने मारहाण करत खंजरचा धाक दाखवून लुटल्याची कबुली दिली.

तसेच घरफोडीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या पथकाने संजय ऊर्फ समीर पंडित नामनूर (वय २८, रा. महेबूबनगर) व सय्यद हनिफ ऊर्फ हनी सय्यद जाफर (वय २०, रा. महेबूबनगर) या दोघांना अटक केली. या चोरट्यांनी शहरातील विविध नगरांतील गेल्या दोन वर्षांपासून शिविजय कॉलनी, चैतन्यनगर, वैशालीनगर, मंत्रीनगर, दीपनगर, संकेतनगर, बेलानगर, स्वस्तिकनगर, सहयोगनगर, आनंदनगरमध्ये घरफोडी केल्याची कबुली दिली. तसेच ज्ञानेश्वरनगर व आनंदनगर या भागातून महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी लंपास केल्याची कबुली दिली. तसेच काबरानगर व इतर ठिकाणांहून दोन बुलेट, एक दुचाकी आणि एक ॲक्टिवा, अशा पाच दुचाकी चोरल्याचे सांगितले. पोलिस अधीक्षक मगर, अतिरिक्त पोलिस अधीक्षक दत्ता राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, सहायक पोलिस निरीक्षक देवकते, सुनील नाईक, पी. डी. भारती, महादेव मांजरमकर, रमाकांत पांचाळ, फौजदार प्रदीप राठोड व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली. या वेळी पोलिस निरीक्षक चिखलीकर उपस्थित होते.

### आरोपींकडून मुद्देमाल जप्त

चारही आरोपींकडून दोन बुलेट व तीन दुचाकी व सुमारे १५ लाखांपर्यंत मुद्देमाल जप्त केल्याचे पोलिस अधीक्षक मगर यांनी सांगितले. ताब्यात घेतलेले गुन्हेगार रेकॉर्डवरील असून संजय नामनूर याच्याविरुद्ध शहरात ३४ घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. या आरोपींकडून एकूण १८ गुन्ह्याचा उलगडा झाला आहे.